# मुद्रण दिन

व्याकरणाचा आणि वृत्तपत्र व अवांतर वाचनाचा अभ्यास झाल्याशिवाय योग्य मुद्रितशोधन होत नाही. वृतपत्र माध्यमात बातमी टाईप करताना अचूक वाक्य रचना आणि शुद्ध शब्दांची मांडणी झाली तरच वृत्तपत्र वाचनीय व संग्रहणीय होते असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार आणि मुद्रितशोधक भरत पाटील यांनी केले.





मू.जे.महाविद्यालयात जनसंज्ञापन आणि वृत्तविद्या विभागाच्या वतीने जागतिक मुद्रण दिन, मराठी राजभाषा दिन आणि राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने ‘बातमीलेखन आणि मुद्रितशोधन शास्त्र’ याविषयी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. मंचावर विभागप्रमुख प्रा.विश्वजीत चौधरी, विभाग समन्वयक दिलीप तिवारी उपस्थित होते.

भरत पाटील म्हणाले की, बातमीलेखनात स्वभावाचे प्रतिबिंब दिसू नये. घटनेचे वार्तांकन करतांना त्रयस्थाची भूमिका ठेवावी. मुद्रितशोधन करतांना शब्द प्रभावशाली व आवश्यक असावेत, असे सांगत पाटील यांनी विविध शब्दांचे लेखन कसे करावे याचे प्रात्यक्षिक दाखविले. दृष्टी व्यापक असावी. शब्द संग्रह आणि शब्द संयम प्रचंड असावे. चौकस बुद्धीतून आणि निरीक्षणातून उत्तम मुद्रितशोधन होते, असेही त्यांनी सांगितले.

परमेश्वर थाटे यांनी सुत्रसंचालन आणि आभार मानले.